मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दिनांक १ ऑक्टोंबर २०२३। पान १

# एक तास स्वच्छतेसाठी उपक्रमात सहभागी व्हा!

## पिंपरी-चिंचवड पालिका आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन



### आयुक्तांनी घेतला उपक्रमाचा आढावा

» दरम्यान, आयुक्त शेखर सिंह यांनी नवी दिशा उपक्रमाचा देखील आढावा घेतला. या उपक्रमाचे योग्य पद्धतीने ब्रँडींग करून रोल मॉडेल तयार झाले पाहिजे, यासाठी संबंधित विभागांनी उपक्रमासाठी आवश्यक वस्तू, साहित्य पुरवठा तसेच स्थापत्य व विद्युत विषयक कामे प्राधान्याने करावीत, अशा सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. या उपक्रमाचे मूल्यांकन करून स्पर्धा घेण्यात येणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत झालेल्या विविध मोहिमांमध्ये पिंपरी चिंचवड शहरवासियांनी सहभाग घेऊन स्वच्छतेचा संदेश कृतीत रुजविला आहे. प्रत्येक नागरिकाच्या मनात स्वच्छतेविषयी जाणीव निर्माण होऊन त्यात सातत्य रहावे यासाठी शहरातील सर्व आस्थापना, स्वयंसेवी संस्था, विविध संघटना, विद्यार्थी, मंडळे, गृहनिर्माण संस्था आणि नागरिकांनी 'स्वच्छता हीच सेवा' या राष्ट्रीय अभियानांतर्गत दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत शहरात विविध ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या 'एक तास स्वच्छतेसाठी' या उपक्रमात स्वयंस्फुर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे. रविवारी १ ऑक्टोबर रोजी शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये 'एक तास स्वच्छतेसाठी' उपक्रम राबविला जाणार आहे.

यामध्ये नागरी सहभागातून कचरा संकलनाच्या व्यापक मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या नियोजन आणि व्यवस्थापनाबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी आज विविध विभागांसमवेत आढावा बैठक घेतली. पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे पार पडली, यावेळी आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, उप आयुक्त अजय चारठाणकर, सह शहर अभियंता डॉ. ज्ञानदेव जुंधारे, संजय कुलकर्णी, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, शीतल वाकडे, उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता अनिल शिंदे, विजयकुमार काळे, नितीन निंबाळकर, राजेंद्र शिंदे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांच्यासह सहाय्यक आरोग्य अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीत आयुक्त शेखर सिंह यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना एक तास स्वच्छतेसाठी मोहिमेच्या अनुषंगाने विविध निर्देश आणि सूचना दिल्या. या मोहिमेमध्ये नागरी सहभाग हा महत्वाचा कणा असून लोकप्रतिनिधींसह विविध घटकांतील प्रतिनिधींचा सहभाग असणे अत्यंत गरजेचे आहे, असे आयुक्त शेखर सिंह यावेळी म्हणाले. मोहिमेचे नियोजन करताना आखणी, व्यवस्थापन आणि नियोजन योग्य पद्धतीने करण्याच्या सूचना देखील त्यांनी दिल्या. या उपक्रमासाठी जास्तीत जास्त लोकसहभाग मिळवून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयाने नियोजन करावे तसेच या उपक्रमात लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, शिक्षक, महिला बचतगट, स्वच्छतादूत तसेच अधिकारी, कर्मचारी, अशासकीय व शासकीय संस्था, औद्योगिक कंपन्या, रिक्षा संघटना, टपरी, पथारी हातगाडी संघटना, फेरीवाले, धार्मिक संस्था, गणेश मंडळे, पर्यावरण प्रेमी, ज्येष्ठ नागरिक संघ, व्यावसायिक, स्वयंसेवी संस्था आदींना सहभागी करून घ्यावे, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. शहराला कचरामुक्त करून स्वच्छ सुंदर बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकामध्ये स्वच्छतेची भावना निर्माण झाली पाहिजे.

# महात्मा गांधी जयंतीनिमित्त पिंपळे सौदागरमध्ये स्वच्छता जनजागृती!

## न्यू सिटी प्राईड स्कूलच्या वतीने संयुक्त कार्यक्रम




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** रहाटणीतील क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले एज्युकेशन फॉउंडेशन संचालित न्यू सिटी प्राईड इंग्लिश मेडीयम स्कूल येथे महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त संयुक्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन ओंकार पाटील व प्रतीक मंगाजे यांनी केले यावेळी संस्थेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार शाळेच्या मुख्याध्यापिका नाझनीन शेख, उपमुख्याध्यापक सचिन कळसाईत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तसेच शाळा परिसराची स्वच्छता करून शाळा ते शिवार चौक परत शिवार चौक ते शाळेपर्यंत रॅली काढण्यात आली. यावेळी स्वच्छता मोहिमेचे बॅनर तसेच झाडे लावा झाडे जगवा, स्वच्छ पिंपरी चिंचवड सुंदर पिंपरी चिंचवड , साफ सफाई करूया आजार हटवूया. पुढील पिढीसाठी चांगली देणं माझा परिसर स्वच्छ ठेवेण असे घोषवाक्य देऊन रहाटणी, पिंपळे सौदागर मध्ये स्वच्छता मोहिमेमार्फत जनजागृती करण्यात केली. यावेळी शाळेतील पाचवी ते दहावी विद्यार्थी, शिक्षक रॅलीला उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ओंकार पाटील यांनी स्वच्छतेबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व महापुरुषांच्या कार्याबद्दलची माहिती दिली. कविता वाटेकर प्रज्ञा शिरोडकर यांनी महापुरुषांबद्दल भाषण केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता भालेराव यांनी केले व आभार सोनाली पाटील यांनी केले.

# भक्तीमय वातावरणात गणरायाला निरोप!

## गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषात

**पिंपरी-चिंचवड| न्यूज एक्सप्रेस मराठी|**

आकर्षक विद्युत रोषणाई फुलांनी सजवलेल्या रथांची रेलचेलढोल ताशांच्या दणदणाट गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषात फुलांची मनसोक्त उधळण करत उत्साह आणि भावपूर्ण वातावरणात गणरायाला चिंचवडकरांनी निरोप दिला. रात्री बारा वाजेपर्यंत ३६ गणेश मंडळांच्या मूर्तींचे विसर्जन झाले. साडे सात तास विसर्जन मिरवणूक चालली. चिंचवड, चापेकर चौकात महापालिकेच्या वतीने स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-



पाटील, विजय खोराटे, उल्हास जगताप, उपायुक्त रविकिरण घोडके यांच्या हस्ते गणेश मंडळांचे स्वागत करण्यात आले. मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्यांच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. शिवतेज मित्र मंडळाची मिरवणूक साडेचार वाजता विसर्जन घाटाकडे रवाना झाली. त्यानंतर सायंकाळी साडे सहाच्या सुमारास ढोल ताशांच्या गजरात चिंचवड स्टेशन येथील श्री ओंकार तरुण मंडळाची मिरवणूक आली. सद्गुरू गणेश मंडळाने पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. मंगलमूर्ती मित्र मंडळाचे गणराय पालखीत विराजमान झाले होते. हरिनामाच्या गजरात विसर्जन मिरवणूक काढली. भोई आळीतील उत्कृष्ट तरुण मंडळाने 'स्वराज्याभिषेकाचा' देखावा सादर केला होता. फुलांची मनसोक्त उधळण केली. गांधीपेठ तालीम मंडळाने 'अश्व मल्हार'चा देखावा सादर केला होता. भंडा-याची मनसोक्त उधळण केली. भगव्या टोप्या परिधान करत आणि फुगडी खेळत महिला सहभागी झाल्या होत्या. चिंचवडचा राजा संत श्री ज्ञानेश्वर मित्र मंडळाने शिवाची मूर्ती असलेल्या रथातून गणरायाची मिरवणूक काढली. उज्जैन येथील ओम प्रतिष्ठानचे डमरू पथक सहभागी झाले होते. जय गुरुदत्त मित्र मंडळाने फुलांनी सजवलेल्या रथातून मिरवणूक काढली. मुंजोबा मित्र मंडळाने आकर्षक फुलांची सजावट केली होती. क्रांतीविर भगतसिंह मित्र मंडळाचे गणराय फुलांनी सजवलेल्या पालखीतुन दाखल झाले. महिलांनी पालखी खांद्यावर घेतली होती. माळी आळीतील ज्ञानदीप मित्र मंडळाने 'श्री कृष्ण' रथ साकारला होता. बैलगाडा शर्यतीचा देखावा सादर केला. नवतरुण मित्र मंडळाचे गणराय विद्युत रोषणाई केलेल्या रथात विराजमान झाले होते. गावडे कॉलनी सांस्कृतिक मित्र मंडळाने आकर्षक अशी फुलांची सजावट केली होती. भोई आळीतील उत्कृष्ट तरुण मित्र मंडळाने 'विठ्ठलरथ' साकारला होता. भोईर आळीतील मोरया मित्र मंडळाची श्रीरामाची मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. समर्थ कॉलनी मित्र मंडळाने 'वज्ररथ' साकारला होता. समर्थ मित्र मंडळाने 'पावनखिंड' देखावा सादर केला. समता तरुण मित्र मंडळाने 'शिवरथ' साकारला होता.

### नवभारत तरुण मंडळाचा 'मयूररथ'


» नवभारत तरुण मंडळाने फुलांच्या सजावटीमध्ये 'मयूररथ' सादर केला होता. श्रीमान महासाधू मोरया गोसावी मित्र मंडळाने श्रीरामाची मूर्ती साकारली होती. छत्रपती शाहू तरुण मंडळाने 'राधाकृष्ण' रथ साकारला होता. श्री छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाने 'श्री दत्त सांप्रदाय रथ' साकारला, श्री काळभैरवनाथ मित्र मंडळाने 'हिंदवी स्वराज्य रथ', गावडे पार्क मित्र मंडळाने 'परीरथ', सुदर्शन मित्र मंडळाने 'बालाजी रथ', श्री मयुरेश्वर मित्र मंडळाने 'बालाजीरथ' साकारला होता.

# पिंपरी-चिंचवडचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद!

## जलशुद्धीकरण दुरुस्तीसाठी पाणीपुरवठ्याची यंत्रणा बंद

**पिंपरी-चिंचवड| न्यूज एक्सप्रेस मराठी|**

निगडी तील जलशुद्धीकरण केंद्रातील देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी ५ ऑक्टोबर रोजी पाणीपुरवठ्याची यंत्रणा बंद ठेवण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळचा पाणीपुरवठा केल्यानंतर दुरुस्तीच्या कामामुळे सायंकाळचा पाणीपुरवठा होणार नाही. तर, शुक्रवारी ६ ऑक्टोबर रोजी सकाळचा पाणीपुरवठा विस्कळीत राहणार असल्याची माहिती सह शहर अभियंता श्रीकांत सवणे यांनी दिली. मावळातील पवना धरणातून पिंपरी- चिंचवडकरांना पाणीपुरवठा केला जातो. रावेत येथील बंधा-यातून



### देखभाल दुरुस्तीची कामे

» सेक्टर २३ निगडी येथे पाणी शुद्ध करुन शहरवासीयांना पुरवठा केला जातो. जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीपुरवठा विषयक नियमित देखभाल दुरुस्ती, पाणी वितरण व्यवस्थेतील विविध ठिकाणी देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत.

अशुद्ध जलउपसा करण्यात येतो. सेक्टर २३ निगडी येथे पाणी शुद्ध करुन शहरवासीयांना पुरवठा केला जातो. जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीपुरवठा विषयक नियमित देखभाल दुरुस्ती, पाणी वितरण व्यवस्थेतील विविध ठिकाणी देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी गुरुवारी शहरातील पाणीपुरवठ्याची यंत्रणा बंद ठेवण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळचा पाणीपुरवठा केला जाईल. परंतु, त्यानंतर दुरुस्तीच्या कामामुळे शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा होणार नाही. दुरुस्तीच्या कामासाठी पाणीपुरवठ्याची सर्व यंत्रणा बंद ठेवल्यामुळे शहरातील सर्व भागात दुस-या दिवशी म्हणजेच शुक्रवारी सकाळचा पाणीपुरवठा विस्कळीत राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

# पाचशे रुपये दिले आणि पाच लाख काढून घेतले!

**पिंपरी-चिंचवड| न्यूज एक्सप्रेस मराठी|**

ऑनलाइन तिकीट बुक करण्याच्या पार्टटाइम कामाचे महिलेला ५०० रुपये दिले. पुढे काही रक्कम देऊन महिलेचा विश्वास संपादन करून अधिक रक्कम गुंतवल्यास चांगले कमिशन मिळेल. तसेच डिपॉझिट म्हणून काही पैसे भरण्यास सांगून तब्बल चार लाख ७९ हजार ४५२ रुपयांची फसवणूक केली. ही घटना २९ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर २०२३ या कालावधीत नवी सांगवी येथे घडली. या प्रकरणी पीडित महिलेने सांगवी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी संशयित यशिका शर्मा तसेच एका कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित यशिका हिने फिर्यादी यांना ऑनलाइन पद्धतीने संपर्क साधला. स्काय स्कॅनर या कंपनीमध्ये ऑनलाइन तिकीट बुक करण्याचा पार्ट टाइम जॉब असल्याचे सांगून एक लिंक पाठवली. या लिंकद्वारे फिर्यादी महिलेने खाते उघडले. कामाच्या बदल्यात महिलेला प्रथम ५०० रुपये, नंतर सहा हजार ७०० आणि २४ हजार रुपये कमिशन म्हणून दिले. जास्त पैसे मिळवण्यासाठी महिलेला अमिष दाखवून चार वेळा पैसे डिपॉझिट करण्यास सांगून महिलेकडून चार लाख ७९ हजार ४५२ रुपये ऑनलाइन पद्धतीने घेतले.

# दावोस दौऱ्यात ३२ कोटींचा खर्च!

## एक लाख पाच हजार कोटींचे ११ उद्योग येणार : उद्योगमंत्री

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** दावोसमध्ये राज्य सरकारकडून जे गुंतवणूक करार करण्यात आले, त्यातील ७७ टक्के करारांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. जवळपास एक लाख पाच हजार २० कोटी रुपयांच्या ११ उद्योगांना देकर पत्र दिले आहे. उर्वरित उद्योगांना पुढील एका महिन्यात प्रत्यक्ष उद्योग सुरू करण्यासाठी देकर पत्र देण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील सरकार प्रयत्नशील आहे. अशी माहिती राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिलीमंत्री उदय सामंत म्हणाले, दावोसमध्ये राज्य सरकारकडून अनेक गुंतवणूक करार करण्यात आले. मात्र, विरोधकांकडून सांगण्यात आले की, या दौऱ्यासाठी ४० कोटी खर्च आला. पण, तो प्रत्यक्षात ३२ कोटी रुपये आहे. त्यातील सर्वात मोठा खर्च हा महाराष्ट्र पॅव्हेलियानला १६ कोटी ३० लाख रुपये आलेला असून ते चार हजार स्क्वेअर फूट मोठे होते. महाविकास आघाडी काळात या दौऱ्यास प्रसिद्धीसाठी दोन कोटी रुपये आंतरराष्ट्रीय स्तरावर खर्च करण्यात आले. पण यंदा चार दिवस परिषद होती आणि त्यावर तीन कोटी ४२ लाख खर्च आला आहे. मंत्री उदय सामंत म्हणाले, आमच्या सरकारने एक कोटी ३७ लाख रुपयांचे करार केले. यापूर्वीच्या सरकारने ८० हजार कोटींचे करार झाले आणि त्यापैकी केवळ १२ हजार कोटी करार प्रत्यक्षात आले. आम्ही एकूण कराराच्या ७७ टक्के म्हणजेच एक लाख पाच हजार २० कोटी रुपयांच्या ११ उद्योगांना देकर पत्र दिलेले आहे. उर्वरित उद्योगांना पुढील एक महिन्यात प्रत्यक्ष उद्योग सुरू करण्यासाठीचे देकर पत्र देण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. मंत्री उदय



सामंत म्हणाले, मुख्यमंत्री तसेच इतर मंत्र्यांच्या परदेश दौऱ्यावर काहीजण सातत्याने चुकीची टीका करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत आहे. एखाद्या गोष्टीचे राजकारण करावे मात्र टीका करताना भाषा चांगली असावी. सातत्याने चुकीच्या गोष्टी सांगून लोकांमध्ये संभ्रम निर्माण केला जाऊ नये. अन्यथा २५ वर्षाच्या कारकिर्दीत कोणाकोणाचा खर्च कोणी केला, कोणी सबसिडीचे फायदे घेतले, याबाबी आम्हालाही मांडावे लागते. मंत्री उदय सामंत म्हणाले, परदेशी गुंतवणूकीत महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर असून तब्बल ३६ हजार कोटींची परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात झालेली आहे. मंत्री सुधीर मुनगंटीवार हे लंडन दौऱ्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची वाघ नखे परत मिळावी याबाबतचा करार करण्यासाठी जाणार आहे. या कार्यक्रमास मी देखील उपस्थित राहणार आहे. त्यासोबत एमआयडीसीचे दोन करार त्याठिकाणी होणार आहे. त्याचसोबत दावोस येथे महाराष्ट्र पॅव्हेलियनची तयारी कशाप्रकारे सुरू आहे. याबाबतची पाहणी देखील मी करणार आहे. माझ्या परदेश दौऱ्याच्या बाबतीत नेमका खर्च कोणी केला याबाबतची माहिती विरोधकांनी मी परदेश दौऱ्यावरून आल्यावर घ्यावी. मुंबईतील रस्त्यावर दरवर्षी डांबर ओतून पुढील वर्षी कसे खड्डे पडतील हे उद्योग कोण करत होते? हे तपासावे लागेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील रस्ते कॉंक्रिटीकरण केल्याने खड्डे मुक्त रस्ते दिसत आहे.

### ठाकरे गटाला इशारा

**» मंत्री उदय सामंत म्हणाले, मुख्यमंत्री तसेच इतर मंत्र्यांच्या परदेश दौऱ्यावर काहीजण सातत्याने चुकीची टीका करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत आहे. एखाद्या गोष्टीचे राजकारण करावे मात्र टीका करताना भाषा चांगली असावी. सातत्याने चुकीच्या गोष्टी सांगून लोकांमध्ये संभ्रम निर्माण केला जाऊ नये. अन्यथा २५ वर्षाच्या कारकिर्दीत कोणाकोणाचा खर्च कोणी केला, कोणी सबसिडीचे फायदे घेतले, याबाबी आम्हालाही मांडावे लागते. मंत्री उदय सामंत म्हणाले, आमच्या सरकारने एक कोटी ३७ लाख रुपयांचे करार केले. यापूर्वीच्या सरकारने ८० हजार कोटींचे करार झाले आणि त्यापैकी केवळ १२ हजार कोटी करार प्रत्यक्षात आले. आम्ही एकूण कराराच्या ७७ टक्के म्हणजेच एक लाख पाच हजार २० कोटी रुपयांच्या ११ उद्योगांना देकर पत्र दिलेले आहे.**

# देशाला महात्मा गांधी यांचे विचारच वाचवू शकतात!

## मोदी सरकारकडून सत्याचे विचार दाबण्याचे काम : सबनीस

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सध्या देशभरात विचारांचे विद्रुपीकरण करण्याचे काम सुरु आहे. सत्याचे विचार दाबण्याचे काम मोदी सरकारकडून सुरु आहे. पंतप्रधान मोदी आपला चेहरा देशभरात व्यापण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यांचा हा प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाही. महात्मा गांधींनी शेवटच्या घटकापर्यंत विकास होण्यासाठी प्रयत्न केला. महात्मा हेच खरे देशाचे नायक असून त्यांचे विचाराच देशाला वाचवू शकतात, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी आयोजित महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित सुमारे १०० दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन बाळासाहेब ठाकरे कलादालनात भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उदघाटन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे सरचिटणीस अ‍ॅड. अभय छाजेड, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी मंत्री रमेश बागवे, माजी नगरसेवक दत्ता बहिरट, लता राजगुरु, कमल व्यवहारे, सर्व ब्लॉक अध्यक्षासह आदी कार्यकर्ते पदाधिकारी



उपस्थित होते. डॉ. सबनीस म्हणाले, सध्या अनेकांच्या डोळ्यावर झापडे आली आहेत. अनेकांची निष्ठा पातळ झालेली आहे. त्या निष्ठा जागेवर याव्यात, गांधीप्रेम, लोकशाही जपण्यासाठी या उद्देशाने गांधींचे विचार पोहचविण्यासाठी सातत्याने गांधीवरील जीवन कार्याचे काम पुढे न्यावे लागेल. जगाला प्रेरीत करणारे गांधी एका देशाचे नसून ते जगभराचे नायक आहे. स्वातंत्र्याबरोबरच त्यांनी विश्वशांतीचादेखील संदेश दिला आहे. विश्वाच्या कल्याणाचा ध्यास त्यांच्या विचारात होता. हाच विचार आपल्याला तारु शकतो. महात्मा गांधीचा लढा श्रमाला ताकद देणारा होता. त्यांनी देशाच्या कल्याणासाठी वस्त्र सोडून पंचा नेसला. महात्मा गांधी सत्याग्रहाने लढले. मात्र आज त्यांच्या विचारा गोळ्या घालण्याचे काम सुरु आहे. काहीजण त्यांच्या स्मृतीस्थळाला गोळ्या घालत आहे. त्यांचे विचार हे लोक कधीही संपवू शकत नाही. पंतप्रधान मोदी त्यांचेच विचाराने पुढे जात आहे. मात्र ते वेगळ्या पद्धतीने सांगत आहे. जगात फिरताना महात्मा गांधीचेच नाव त्यांना घ्यावे लागते. मात्र देशात गांधीचे नाव दाबण्याचे काम त्यांच्या हातून होत असल्याची खंत यावेळी सबनिस यांनी व्यक्त केली. महात्मा गांधी यांचे योगदान देश कधीही विसरणार नाही. अखंड भारतासाठी गांधीचा हा मुळ ध्येयवाद होता.

### महिलांनी केली शिवीगाळ

**» डॉ. सबनीस म्हणाले, सध्या अनेकांच्या डोळ्यावर झापडे आली आहेत. अनेकांची निष्ठा पातळ झालेली आहे. त्या निष्ठा जागेवर याव्यात, गांधीप्रेम, लोकशाही जपण्यासाठी या उद्देशाने गांधींचे विचार पोहचविण्यासाठी सातत्याने गांधीवरील जीवन कार्याचे काम पुढे न्यावे लागेल. जगाला प्रेरीत करणारे गांधी एका देशाचे नसून ते जगभराचे नायक आहे. स्वातंत्र्याबरोबरच त्यांनी विश्वशांतीचादेखील संदेश दिला आहे. विश्वाच्या कल्याणाचा ध्यास त्यांच्या विचारात होता. हाच विचार आपल्याला तारु शकतो.**

# सरकारकडून राज्याचा खेळखंडोबा!

## तहसीलदारांच्या कंत्राटी भरतीवरून संतापल्या खा. सुप्रिया सुळे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भाजपाला या महाराष्ट्राचं नेमकं काय करायचंय? आता तहसीलदार देखील कंत्राटी पद्धतीने नेमण्याचा घाट या सरकारने घातला आहे, असे म्हणत खासदार सुप्रिया सुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. हा निर्णय घेताना रात्रंदिवस एक करून मुलं स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतात, त्यांचा तरी विचार करायला हवा होता, अशी संतप्त प्रतिक्रिया सुळे यांनी व्यक्त केली. जळगावच्या जिल्हा धिकाऱ्यांनी तहसीलदार पदासाठी कंत्राटी भरती करण्याबाबत जाहिरात दिली आहे, त्यावरून खासदार सुळे यांनी सरकारला धारेवर धरले असून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे काय असा सवाल उपस्थित केला आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, खरंतर या सरकारने मुख्यमंत्री, हवे तेवढे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि अख्खं मंत्रीमंडळ कंत्राटी पद्धतीने चालवायला द्यावं, असे म्हणत सुळे यांनी, 'उपहासाचा भाग सोडला तर हे सरकार असे असंवेदनशील निर्णय का घेतंय याचे आश्चर्य वाटते. कारण या राज्यात लाखो



मुलं दरवर्षी तहसीलदार आणि तत्सम पदांवर निवड व्हावी. क्लास वन अधिकारी होऊन आईवडिलांची स्वप्ने साकार करावी यासाठी एमपीएससीची परीक्षा देतात' अशी भावना व्यक्त केली आहे. वर्षोनुवर्षे झिजून मुले अभ्यास करतात, मेहनत करतात. त्यांची अर्धी संधी अगोदर 'लॅटरल एन्ट्री'च्या नावाखाली आणि उरलेली अर्धी कंत्राटी पद्धतीच्या नावाखाली गिळंकृत केली जात आहे. संपूर्ण व्यवस्थेचा खेळखंडोबा करणारे हे असले आदेश काढण्याआधी किमान या पोरांचा तरी विचार शासनाने करायला हवा होता. काही चांगलं करता येत नसेल तर किमान कुणाचं वाईट तरी करु नये हे तत्त्व या राज्यकर्त्यांच्या लक्षात येत नाही का? असा सवाल खासदार सुळे यांनी सरकारला विचारला आहे.


### सरकारच कंत्राटी पद्धतीने चालू झाले

**» सुप्रिया सुळे म्हणाल्या की, खरंतर या सरकारने मुख्यमंत्री, हवे तेवढे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि अख्खं मंत्रीमंडळ कंत्राटी पद्धतीने चालवायला द्यावं, असे म्हणत सुळे यांनी, 'उपहासाचा भाग सोडला तर हे सरकार असे असंवेदनशील निर्णय का घेतंय याचे आश्चर्य वाटते. कारण या राज्यात लाखो मुलं दरवर्षी तहसीलदार आणि तत्सम पदांवर निवड व्हावी. क्लास वन अधिकारी होऊन आईवडिलांची स्वप्ने साकार करावी यासाठी एमपीएससीची परीक्षा देतात' अशी भावना व्यक्त केली आहे.**

# गणेशोत्सवात तब्बल ११०० मोबाईल चोरीला!

## विसर्जन मिरवणुकीत चोरट्यांनी कारनामा; एकास अटक

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुक अनोख्या स्वरूपात मोठ्या जल्लोषात साजरी केली जाते. मात्र, त्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी अनेकांचे मोबाइल चोरी करत लाखो रुपयांचा गंडा घातला आहे. लक्ष्मी रस्त्यासह टिळक रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता या विसर्जन मार्गावर आणि गणेशोत्सवात विविध गणेश मंडळ परिसरात गर्दीच्या ठिकाणी तब्बल ११०० पेक्षा अधिक मोबाईल चोरीस गेल्याची घटना घडली आहे. गणेशोत्सवात भाविकांच्या खिशातील रोकड, तसेच महिलांच्या गळ्यातील दागिने चोरण्याच्या घटना दरवर्षी मोठ्या प्रमाणात घडत असतात. पुण्यातील विसर्जन सोहळा राज्यभरातील आणि देशातील भाविकांचे आकर्षण आहे. गुरुवारी दिवसभर आणि मध्यरात्री लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता परिसरात मुख्य विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी



### पोलिसांनी केले १०५ मोबाइल जप्त

**» यंदा गणेशोत्सवात मोबाइल चोरीला गेल्याच्या ११०० पेक्षा जास्त तक्रारी पुणे पोलिसांच्या 'लॉस्ट अँड फाऊंड' या ऑनलाइन पोर्टलवर करण्यात आल्या आहेत. विश्रामबाग, खडक, फरासखाना पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मोबाइल चोरीला गेल्याच्या सर्वाधिक तक्रारी दाखल झाल्या आहे. नुकतेच हडपसर पोलिसांनी नागरिकांचे मोबाइल चोरणाऱ्या झारखंडमधील चोरट्यांच्या दोन टोळ्या जेरबंद करून त्यांच्याकडून १०५ मोबाइल जप्त केले आहे.**

आलेल्या नागरिकांचे हजार पेक्षा अधिक मोबाइल चोरट्यांनी चोरले आहे. यंदा गणेशोत्सवात मोबाइल चोरीला गेल्याच्या ११०० पेक्षा जास्त तक्रारी पुणे पोलिसांच्या 'लॉस्ट अँड फाऊंड' या ऑनलाइन पोर्टलवर करण्यात आल्या आहेत. विश्रामबाग, खडक, फरासखाना पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मोबाइल चोरीला गेल्याच्या सर्वाधिक तक्रारी दाखल झाल्या आहे. नुकतेच हडपसर पोलिसांनी नागरिकांचे मोबाइल चोरणाऱ्या झारखंडमधील चोरट्यांच्या दोन टोळ्या जेरबंद करून त्यांच्याकडून १०५ मोबाइल जप्त केले आहे. गणपती विसर्जन मिरवणूकीत गर्दीचा फायदा घेउन ७० हजारांचा मोबाइल चोरणार्याला फरासखाना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना २८ सप्टेंबरला दुपारी तीनच्या सुमारास शिवाजी रोडवर घडली होती.चंदनकुमार मनोकामना पासदान (वय २५, रा. मोशी ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी शुभम पायमोडे (वय २७, रा. धनकवडी) यांनी फरासखाना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शुभमला चोरट्याची हालचाल लक्षात येताच, त्याने त्याला पकडले. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. तर, दुसऱ्या गुन्ह्यात विश्रामबाग पोलिसांनी कर्नाटक मधील तीन अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून आठ मोबाईल जप्त केले आहे.

# विमान तिकीट देण्याच्या बहाण्याने फसवणूक!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** विमान प्रवासाची तिकीटे कमी किंमतीत मिळवून देण्याच्या बहाण्याने एका हॉलिडेजच्या मालकाने ३ लाख ८७ हजार ६८० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी रोहित आबासो कोतवाल (वय ३०, रा. मांजरी) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार अनिकेत दामले (रा. विश्रांतवाडी) यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. ही घटना १४ फेब्रुवारी ते २१ मार्च २०२३ दरम्यान घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, तक्रारदार रोहित कोतवाल हे पार्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे मालक आहेत. त्यांनी ४० ग्राहकांसाठी केदारनाथ ट्रिपचे आयोजन केले होते. आरोपी अनिकेत दामले हे आर्या हॉलिडेजचे मालक आहेत. दामले यांनी तक्रारदार यांना कमी किंमतीत पुणे ते दिल्ली विमान तिकिटे काढून देतो, असे सांगून पहिल्यांदा १ लाख ६१ हजार ८०० रुपये घेतले. तसेच हे पैसे परत न करता तिकिटांची किंमत वाढली म्हणून २ लाख २८ हजार रुपये असे ३ लाख ८७ हजार ६८० रुपये घेऊन विमान तिकिटे न देता तक्रारदार यांची फसवणूक केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एस गांधले करत आहेत. पुणे शहरातील लोहगाव भागातील केंद्रीय विद्यालयातील वीजमीटर, नळ चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत दत्तात्रय सुरोड (वय ४४, रा. स्टाफ क्वार्टर, केंद्रीय विद्यालय, लोहगाव) यांनी विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लोहगाव परिसरातील हवाई दल तळ परिसरात केंद्रीय महाविद्यालय आहे. मध्यरात्री चोरटे केंद्रीय विद्यालयाच्या आवारात शिरले. चोरट्यांनी शाळेतील नळ, तसेच वीजमीटर चोरुन नेल्याची घटना सकाळी उघडकीस आली.